महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये
प्राप्त झालेली तक्रार

माहितीचा अधिकार

तक्रार क्रमांक: १४/२०२३

| तक्रारकर्ता | प्रतिवादी | |
|---|---|---|
| श्री. वासुदेव नत्थुजी चौधरी, मु. पो. मुर्ति ता. काटोल जि. नागपूर | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी |
| | खंड विकास अधिकारी कार्यालय, पंचायत समिती काटोल जि. नागपूर | खंड विकास अधिकारी, पंचायत समिती काटोल जि. नागपूर |

## सुनावणी दिनांक ११.०६.२०२५

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) नुसार व्दितीय अपील क्र. ६७६/२०२१ मध्ये दिनांक ०५.१२.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्याने दि. १०.०१.२०२३ (प्राप्त दिनांक १०.०१.२०२३) रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारीवर आज दिनांक ११.०६.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती काटोल श्रीम. लता बबनराव चलपे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. ६७६/२०२१ मध्ये दिनांक ०५.१२.२०२२ रोजी सुनावणी घेवून पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

" आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्याने अधिक शहानिशा होऊ शकलेली नाही. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासकीय परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/२०१५) सहा, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. ०१.१२.२०१५ रोजीच्या परिपत्रकानुसार आयोगाची सुनावणी नोटीस प्राप्त झाल्यानंतर सर्व सार्वजनिक प्राधिकरणास उपस्थिती बंधनकारक राहील असे सुचित करण्यात आलेले आहे. उभय अधिकाऱ्यांनी याबाबत नोंद घेवून त्यांच्या अनुपस्थितीचा अहवाल सदर आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत व्यक्तीश: हजर राहून सादर करावा

सदर प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ७ दिवसात अपिलार्थीस माहिती अर्जात नमुद असलेली माहिती कलम ७ (६) नुसार विनामुल्य उपलब्ध करून द्यावी व त्याची पोहच आयोगास पाठवावी, असे आदेशित करून प्रस्तुत व्दितीय अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे."

तक्रारकर्ता यांनी आयोगाच्या उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत दिनांक १०.०१.२०२३ रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, " ग्रामपंचायत ,गणेशपूर , पं.स. काटोल जि. नागपूर यांना दि. १५.०१.२०२१ रोजी संपूर्ण माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलमान्वये

(१) जनमाहिती अधिकारी (२) खंड विकास अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, पंचायत समिती काटोल यांना माहिती मागितली परंतु माहिती देण्यास टाळाटाळ करीत होते. म्हणुन मा. माहिती आयुक्त साहेब, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर येथे अपिल केले होते. सदर अपिलाची सुनावणीचा दिनांक ०५.१२.२०२०२२ रोजी होती. परंतु सुनावणीकरता (१) जनमाहिती अधिकारी (२) प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर होते महोदय मी सुनावणीसाठी हजर होतो. आपण मला माहिती देण्यात यावी, असे आदेश दिले होते. परंतु मला आजपर्यंतही माहिती प्राप्त झाली नाही करिता आपण सदर अर्जावर विचार करुन मला माहिती मिळावी म्हणुन मदत करावी" अशी आयोगास विनंती केली आहे.

**युक्तीवाद/खुलासा** :-आज सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहे. उपस्थित प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती काटोल यांनी आयोगास दाखल केलेल्या दस्ताऐवजानुसार, सरपंच, ग्रामपंचायत गणेशपूर यांनी दि. १३.०१.२०१९ रोजी दिलेल्या प्रमाणपत्रात, सरपंच गट ग्रामपंचायत गणेशपूर कडून प्रमाणपत्र देण्यात येते की, श्री. पि.व्ही. खरळकर सचिव, गट ग्राम पंचायत गणेशपूर हे श्री. श्रावण महादेवरावजी कोठडे यांचेकडे किरायाने राहत आहे.

**निष्कर्ष**: सदर तक्रारीसंदर्भात सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) नुसार राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाकडे थेट तक्रार दाखल करणारे, श्री. वासुदेव नत्थुजी चौधरी हे आज दि. ११ जून २०२५ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी कोणतीही पूर्वसूचना न देता गैरहजर होते. यावरुन हे स्पष्ट होते की, मागितलेली माहिती मिळविण्यात त्यांना कोणतीही रूची दिसत नाही.

२. त्यांच्या तक्रारीची दखल घेत आयोगाने त्यांना आणि पंचायत समिती, काटोल, जि. नागपूर या प्राधिकरणाला सूचना लेखी पाठविली होती. त्याला प्रतिसाद देत प्राधिकरणाने हजेरी लावली आणि तक्रारादाने केलेल्या माहितीच्या मागणीनुसार योग्य ती माहिती पुरविल्याचे सुनावणीवेळी नमूद केले.

३. तक्रारदार स्वत: अनुपस्थित राहिल्याने त्यांना आता कोणतीही माहिती नको आहे, हे गृहित धरून त्यांची तक्रार फेटाळणे योग्य राहिल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज फेटाळण्यात येत आहे.

Gnimdeo

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : ११.०६.२०२५

जा.क्र. 3196 दि. 24 JUN 2025

SD E:\तक्रार क्र. 14-2023- चौधरी